दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
# रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
गणपती बाप्पा मोरया
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १७ वे ● अंक १५८ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.७ सप्टेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# शिवसेनेचा दसरा मेळावा शिवतिर्थावरच : उद्धव ठाकरे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या दौऱ्यानंतर महापालिका निवडणुकांची रणनिती ठरविण्यासाठी शिवसेनेनंही पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंच्या अध्यक्षतेखाली आज बैठक घेतली. काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या दसरा मेळाव्यावरुन शिंदे गट विरुद्ध ठाकरे गट असा वाद शिवसेनेत रंगला आहे. दोन्ही गटांनी दसरा मेळाव्यावर आ-पलाच हक्क दाखवला असून सध्या हा विषय सध्या कागदांत अडकला आहे. या वादावर उद्धव ठाकरे यांनी आपली स्पष्ट भूमिका शिवसेना पदाधिकाऱ्यांसमोर मांडली. तसेच, शिवतिर्थावर दसरा मेळावा आपलाच होणार असल्याचं त्यांनी ठणकावून सांगितलं.**



अमित शहांनी मुंबई दौऱ्यादरम्यान शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार निशाणा साधला. उद्धव ठाकरेंनी आपल्याला दगा दिला. शिवसेनेनं पाठीत खंजीर खुपसला. त्यामुळे उद्धव ठाकरेंना जमीन दाखवा, असं अमित शहा म्हणाले. आजच्या शिवसेनेच्या बैठकीत उद्धव ठाकरेंनी जमीन दाखविण्याची भाषा करणाऱ्यांना आस्मान दाखविण्याचा मंत्र पदाधिकाऱ्यांना दिला. तसेच, दसरा मेळाव्यासंदर्भातही भाष्य केलं. शिवसेनेचा दसरा मेळावा मुंबईतील शिवतिर्थ मैदाना-वरच होणार असल्याचं उद्धव ठाकरेंनी यावेळी ठणकावून सांगितलं. आता, मोठी जबाबदारी निष्ठावंतांवर आहे, आपल्याला मिळून ही लढाई लढायची आहे, असेही उद्धव ठाकरेंनी यावेळी शिवसेना नेत्यांना सांगितलं. तर, अमित शहांचा मुंबई दौरा म्हणजे वरुन किर्तन आतून तमाशा असल्याची टिकाही त्यांनी केली.

आगामी मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी भाजपा जोरदार तयारी केली असताना आता शिवसेना देखील मैदानात उतरली आहे. अमित शाह यांच्या मुंबई दौऱ्यानंतर शिवसेनेने ७ ऑगस्ट म्हणजेच उद्या विभागप्रमुख आणि महिला संघटकांची बैठक बोलावली आहे. मातोश्री या निवासस्थानी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत सदर बैठक पार पडणार आहे.




**पनवेल येथील मिरची गल्लीचा राजा नावाने प्रसिद्ध असलेल्या स्वराज्य सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाची यंदा १३ फुट उंचीची सुंदर भव्य गणेशमुर्ती. मंडळाचे यंदा २० वे वर्षे असून लालबाग येथील प्रसिद्ध मुर्तीकार कुणाल डिंगणकर यांनी ही गणपती बाप्पाची सुबक मुर्ती साकारली आहे. (छाया : अमित पोतदार, पनवेल)**

## बुडालेल्या दोन युवकांचे अखेर सापडले मृतदेह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील कोप्रोली गावातील कमांडर सोसायटी मधील दोन युवक काल उशिरा रात्री गणेश विसर्जन प्रसंगी बुडाल्याने खळबळ माजली होती. आज दुपारी सदर दोन युवकांचे मृतदेह मिळून आले आहेत.

राजशेखर माणिक जमादार, वय २० आणी विक्रम दिगंबर जमादार - वय २१ अशी बुडालेल्या युवकांची नावे आहेत. स्वतःच्या घरचे विसर्जन आटोपून दोघे कमांडर सोसायटीच्या गणपतीचे विसर्जन होताना ही दुर्दैवी घटना घडली. दोन्ही मृत युवक एकाच कुटुंबातील आहेत. स्वतःची मुले डोळ्या समोर बुडताना पाहण्याचे दुर्दैव या कुटुंबियांना मिळाले. दरम्यान पनवेल तालुका पोलिसांचे पथक व ग्रामस्थांच्या मदतीने या नदीत बुडालेल्या त्या दोघांचा शोध सुरु होता.

अखेरीस आज दुपारी या दोघांचे मृतदेह मिळाल्याची माहिती पोलीस सुत्रांकडून देण्यात आली आहे.

## मुरुडमध्ये दुचाकी स्वरांची समोरासमोर धडक ; १ गंभीर

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड शहरात दोन दुचाकी स्वरांमध्ये भीषण टक्कर होऊन एक गंभीर जखमी झाले. एक मोटार सायकल स्वार अत्यंत गंभीर जखमी झाल्याने त्याला मुंबई येथे उपचारासाठी हलविण्यात आले याची स्थिती चिंताजनक असल्याचे समजते. दुसरा स्कुटी चालक हा मुरुड ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले आहे मुका मार लागला आहे.

गौरी गणपतीच्या विसर्जनाच्या दिवशी रात्री अकराच्या सुमारास मुरुड गोल बंगला ते शंकर मंदिर रस्त्यावर माळी समाज हॉल जवळ या दोन बाईक स्वारांची समोरासमोर टक्कर झाली. ही टक्कर इतकी जोरदार होती की एवेंजर चालक अभी किल्लेकर हा तिथे उभा असलेल्या डंपर खाली घटपटत गेला. त्यामुळे गंभीर जखमी झाल्याने त्याला मुंबई येथे हलविण्यात आले याची स्थिती चिंताजनक असल्याचे समजते. स्कुटी चालक जमीन शेख याला गंभीर दुखापत झाल्याने मुरुड ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले आहे.



## संक्षिप्त...

### एका तडीपार गुंडाचं ऐकेल एवढा महाराष्ट्र दुबळा नाही : सुषमा अंधारे

**दै.रायगड नगरी । पुणे**

केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपचे वरिष्ठ नेते अमित शहा यांच्या वक्तव्याचा शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी जोरदार समाचार घेतला आहे. 'महाराष्ट्र मनाने इतका दुबळा नाही की त्याने एखाद्या तडीपार गुंडाचा ऐकावं', असं म्हणत सुषमा अंधारे यांनी अमित शहा यांना प्रत्युत्तर दिले आहे.

'शिवसेना कोणाची, शिवसेना संपेल की राहील यावर एखादा तडीपार गुंड येथे येऊन मतं मांडत असतील तर महाराष्ट्राचे कान इतके दुबळे नक्कीच नाहीत. महाराष्ट्र इतक्या दुबळ्या आणि हलक्या मनाचा नक्कीच नाही की तो आपला सद्सदविवेक हरवून एखाद्या तडीपार गुंडाच म्हणणं ऐकेल. शिवसेना कालही होती शिवसेना आजही आहे. शिवसेना उद्याही राहील. पण ज्या महाशक्तीच्या नादाला लागून विद्यमान मुख्यमंत्री आपली खुर्ची सांभाळू पाहत आहेत, त्यांनी एक नक्की लक्षात ठेवावं. ज्या वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांनी रक्ताचं पाणी करून शिवसेना उभी केली त्या शिवसेनेसोबत भाजप, अमित शहा आणि मोदीजी करत असतील तर तेच मोदी - शहा, भाजप एकनाथ शिंदेंना किती काळ साथ देतील याची शिंदेंनी खबरदारी घेण्याची गरज आहे', असा घणाघात सुषमा अंधारे यांनी केला आहे. दुसरीकडे उद्धव ठाकरे यांना आव्हान देणाऱ्या खासदार नवनीत राणा यांचा देखील सुषमा अंधारे यांनी कडवट शब्दांत समाचार घेतला आहे. नवनीत राणा यांच्या बद्दल मला फार काही बोलावसं वाटत नाही.

## रायगडातून काँग्रेसचे तीन आमदार देणार : महेंद्रशेठ घरत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रायगड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी रायगड जिल्हा काँग्रेस अध्यक्ष पदाची धुरा यशस्वी आणि प्रभावीपणे सांभाळून एक वर्षाचा कालावधी पूर्ण केला.

कोकण चे भाग्यविधाते स्व.बॅरिस्टर ए.आर. अंतुले यांच्या नंतर रायगड मध्ये काँग्रेस पक्षाची बिकट अवस्था झाली होती. त्यातच तात्कालीन रायगड जिल्हा काँग्रेस अध्यक्ष माणिकराव जगताप, माजी आमदार मधुकरशेठ ठाकूर, श्याम म्हात्रे यांच्या सारख्या नेत्यांच्या अचानक जाण्यामुळे पक्षाची अवस्था अधिकच गंभीर झाली. अश्या विपरित परिस्थितीत रायगड जिल्हा काँग्रेस पक्षाची धुरा कामगार नेते महेंद्र घरत यांच्याकडे आली.



ग्रामपंचायत स्तरापासून जिल्हापरिषद ते इंटक चे राष्ट्रीय सचिव तसेच आयटीएफ लंडन या बहुराष्ट्रीय संघाच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करणाऱ्या महेंद्र घरत यांनी या संधीचे सोने केले. महेंद्र घरत यांनी सर्वप्रथम तळागळापर्यंतच्या जुन्या काँग्रेस कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी घेण्यास सुरुवात केली. संपूर्ण जिल्हा पिंजून काढला आणि काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये एक विश्वास निर्माण करून आशा पल्लवीत केल्या. रायगड जिल्हा काँग्रेस पक्षाला नवसंजीवनी मिळाल्याची भावना आज कार्यकर्त्यांमध्ये झाली आहे. हे करताना घरत यांनी तन मन धन पूर्णपणे समर्पित केले. रोखठोक बोलणे या त्यांच्या स्वभावामुळे पक्षासाठी झटून काम करणारे कार्यकर्ते त्यांच्याकडे आकर्षित झाले आहेत. काल परवापर्यंत फक्त पक्षाला मतदान करण्यापुरते घराबाहेर पडणारे काँग्रेस कार्यकर्ते आज घराबाहेर पडून कामाला लागले आहेत ते फक्त महेंद्र घरत यांचे झंझावाती काम पाहूनचं. विविध प्रकारचे आंदोलन, धरणे, मोर्चे, रॅली, मेळावे, पक्षप्रवेश आणि बैठका घेऊन पक्षाचा आवाज रायगड जिल्ह्यात महेंद्र घरत यांनी बुलंद केला. रायगड जिल्ह्यात काँग्रेसला कमी लेखणाऱ्या विरोधकांबरोबरचं आघाडीतील घटक पक्षांना देखील आता काँग्रेसला मानाचे स्थान देणे भाग पडले आहे.

...//२

## कर्जत नगरपरिषदेच्या मुख्याधिकारीपदी वैभव गारवे

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत नगरपरिषदेच्या मुख्याधिकारीपदी वैभव गारवे यांची नियुक्ती करण्यात आली आहे, त्यांनी २ सप्टेंबर रोजी मुख्याधिकारी पदाचा पदभार स्वीकारला आहे.



कर्जत नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांची २ मे २०२२ रोजी बदली झाली, त्यांच्या जागी कर्जत नगरपरिषदेवर नवीन मुख्याधिकारी यांची नियुक्ती न झाल्याने माथेरानच्या मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांना ४ मे २०२२ रोजी कर्जत नगरपरिषदेचा अतिरिक्त कार्यभार दिला.

डॉ. पंकज पाटील यांच्या जागी ठाणे जिल्ह्यातील शहापूर नगरपंचायत मधून कर्जत नगरपरिषदेवर मुख्याधिकारी म्हणून वैभव गारवे यांची नियुक्ती झाली आहे, त्यांनी २ सप्टेंबर रोजी कर्जत नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी पदाचा पदभार स्विकारला आहे, गारवे यांनी यापूर्वी रायगड जिल्ह्यातील म्हसळा येथे काम केले आहे.

## पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आलेल्या तक्रारदाराचाच झाला मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर पोलीस ठाण्यात तक्रार करण्यास आलेल्या एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याने पोलीस ठाण्यात गोंधळ उडाला. एकाच कुटुंबातील दोन गटात झालेला वाद पोलिसांपर्यंत गेला होता. यात एकाला पोलीस ठाण्यात बोलावण्यात आले. त्यावेळी त्यांचा मृत्यू झाला.

रामसिंग चव्हाण असे मयत व्यक्तीचे नाव आहे. चौहान हे मूळ अमरावतीचे असून पोटापाण्यासाठी खारघर येथे अनेक वर्षांपासून राहतात. त्यांच्याच भावकितील काही लोकांशी त्यांचा वाद झाला. यात दोन गट पडले. हा वाद एवढा विकोपाला गेला की, दोन्ही गटांनी पोलीस ठाणे गाठले. याबाबत अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्याचे काम सुरू होते. त्याचवेळी अचानक रामसिंग चक्कर येऊन पडले. त्यांना एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याठिकाणी उपचार होणे शक्य नसल्याने त्यांना एम.जी.एम. रुग्णालयात नेण्यात आले असता त्यांना मृत घोषित करण्यात आले.

## सर्वसामान्य जनतेची सेवा हाच आमचा वसा : खा.सुनील तटकरे



**दै.रायगड नगरी । म्हसळा**

जलजिवन मिशन योजने अंतर्गत १०.३३ कोटी रुपयांची शासन मंजुरी मिळालेल्या तोंडसुरे पाणी पुरवठा योजनेचा भूमिपूजन सोहळा मौजे वरवठणे - आगरवाडा येथे खासदार सुनिल तटकरे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात आणि थाटामाटात संपन्न झाला. आयोजीत सत्कार सोहळ्यात खासदार सुनिल तटकरे यांनी मनोगत व्यक्त करताना मी लोकांच्यातला आहे आणि मी लोकांसाठी झटणारा असून सर्वसामान्य जनतेची सेवा करण्याचा वसा आम्ही घेतला असून यापुढेही अशीच सेवा करण्याचा मनोदय त्यांनी याप्रसंगी व्यक्त केला.

गणपती उत्सव असतानाही पाणी पुरवठा योजनेच्या भूमिपूजन कार्यक्रमाला लोकांची उपस्थिती पाहून लोकांच्या भावना किती तीव्रतेच्या आहेत याची खात्री होते. शिखर समितीचे अध्यक्ष महादेव पाटील, सरपंच, महीला सरपंच यांना प्रशासकीय कामाचा अनुभव असल्याने हि योजना ताब्यात घेऊन योजनेचा पालन पोषण आईच्या ममतेने करायचे आहे अशा सूचनाही खासदार तटकरे यांनी दिल्या. तोंडसुरे नळपाणी पुरवठा योजना हि खरसई धरणाचे उद्भवाचे खाली विहिरीतून प्रस्तावित असल्याने खरसई येथील धरण प्रकल्पग्रस्त व ग्रामस्थांचे काही प्रश्न प्रलंबीत असल्याचे निवेदन मला देण्यात आले आहे. धरण प्रकल्प योजनेतून शेजारील गावांना पाणी पुरवठा योजना आरखडा तयार केल्या वरून खरसई ग्रामस्थांचा नाराजीचा सुर असला तरी येत्या १७ तारखेला अधिकारी वर्गा सोबत संयुक्त बैठक घेऊन प्रश्नांची सोडवणूक करू असे आश्वासन देताना धरणात मुबलक पाणी पुरवठा असुन येत्या आठ दिवसांत खरसई गावासाठी स्वतंत्र नळपाणीपुरवठा योजनेला मंजुरी देण्यात येईल असे खासदार तटकरे यांनी खात्री देताना आपल्यातील गैरसमजातील संवाद कमी करणे म्हणजे गैरसमजाला मार्ग काढणे असा होतो. रायगडचा पालकमंत्री असताना

...//२

# तळपता तारा निखळला !

भारतीय उद्योग जगतातील तळपता तारा अचानक निखळून पडला आहे. सायरस मिस्त्री यांचे अपघाती निधन हा केवळ त्यांच्या शापूरजी पालनजी उद्योगसमूहावर झालेला आघात नाही. केवळ ५४ वर्षांचे असणारे सायरस मिस्त्री हे पुढच्या काळात देशातील आणि जगातील एक महत्त्वाचे उद्योगपती म्हणून अधिक भरीव कामगिरी करत राहिले असते. आजवरचा त्यांचा प्रवास हा तसाच होता. करोना काळात आपल्या उद्योगावर आलेल्या आर्थिक संकटातून सायरस यांनी मोठ्या हिकमतीने वाट काढली होती आणि करोना संपल्यानंतर नव्या तडफेने कामाला आरंभ केला होता. देशातल्या काही हजार किलोमीटर महामार्गाच्या उभारणीत ज्या समूहाचा सिंहाचा वाटा असावा; त्याच्या प्रमुखालाच अपघातात असा मृत्यू यावा, याइतकी दुसरी शोकांतिका नसेल. सायरस यांच्यासोबत त्यांचे जवळचे स्नेही जहांगीर पंडोल यांचाही जागीच मृत्यू ओढवला. सायरस यांची सांपत्तिक स्थिती पाहता ते हा प्रवास हेलिकॉप्टरनेही सहज करू शकले असते. ते प्रवास करीत असलेली गाडीही नामांकित कंपनीची, उत्तम निगराणी ठेवलेली अशी होती. तरीही हा अपघात झाला. सायरस मिस्त्री हे काही वर्षांपूर्वी, सन २०१२ मध्ये टाटा सन्सचे प्रमुख म्हणून निवडले गेले, तेव्हा ते या ऐतिहासिक उद्योग समूहाचे नेतृत्व करणारे सगळ्यांत तरुण आणि टाटांच्या कुटुंबाबाहेरचे केवळ दुसरे उद्योगपती ठरले होते. त्यांच्या निवडीची प्रदीर्घ प्रक्रिया पुरी झाल्यानंतर त्यांनी टाटा समूहाला भविष्यात कोणत्या दिशेने न्यायचे आहे, याबाबत काही स्वप्ने पाहिली होती. त्यातील काही बोलूनही दाखविली होती. त्यांचे स्वागत करताना 'टाटांचे नेतृत्व तरुण हातात गेल्यामुळे पुढची अनेक दशके या उद्योगसमूहाला स्थिर आणि भविष्यवेधी नेतृत्व मिळत राहील,' अशी अपेक्षा तेव्हा व्यक्त होत होती. ते खरेही होते. मात्र, एखादे रमणीय स्वप्न भंग व्हावे, तशा काही कुरबुरी सुरू झाल्या. कज्जेदलाली झाली आणि चार वर्षांतच सायरस मिस्त्री यांना टाटा सन्समधून पायउतार व्हावे लागले होते. 'आपल्या सन्मानाला धक्का लागू नये आणि आपली सचोटी वादातीत राहावी,' या एकाच कारणासाठी सायरस यांनी या प्रकरणात शेवटपर्यंत न्यायालयीन लढा दिला. मात्र, त्यातही त्यांना यश आले नाही. वयाची पाच दशकेही पुरी झालेली नसताना आधी आलेली ऐतिहासिक जबाबदारी आणि नंतर चारच वर्षांमध्ये त्यापासून दूर व्हावे लागणे, या दोन्ही घटना सायरस मिस्त्री यांनी समतोल बुद्धीने स्वीकारल्या. त्यांची ही प्रगल्भता त्यांच्यावरील संस्कार आणि त्यांची एक उद्योजक म्हणून झालेली जडणघडण दाखविणारी होती. खरेतर, टाटा सन्समधील शापूरजी पालनजी हे महत्त्वाचे भागधारक होते आणि आहेत. तरीही, एकदा हा टाटा अध्याय संपल्यावर सायरस यांनी आपल्या स्वत:च्या कंपन्यांवर लक्ष केंद्रित केले आणि भारताच्या बाहेर अनेक देशांमध्ये आपला उद्योग विस्तारला. शिक्षणाचा, कौटुंबिक परंपरांचा किंवा श्रीमंतीचा अहंकाराकडे झुकणारा अभिमान न बाळगणे, हा पारशी समाजाचा एक सामूहिक सद्गुणच आहे. तो मिस्त्री यांच्यात काठोकाठ होता. त्यांचे वागणे, बोलणे सहज असे. अकारण तर सोडाच पण सकारण प्रसिद्धी त्यांना नकोशी वाटे. त्यांचे आईमुळे आयरिश नागरिकत्व होते. मात्र, त्यांची सारी कारकीर्द भारतात घडली. 'मी जगाचा नागरिक आहे,' असे ते नेहेमी म्हणत आणि त्यांनी आपल्या कंपनीचा विस्तार करताना हाच दृष्टिकोन मनाशी कायम ठेवला होता. इतका गुणी, सुसंस्कृत आणि कल्पक उद्योगपती अशा अकाली जाणे, ही किती मोठी राष्ट्रीय हानी आहे, याची कल्पनाही करवत नाही. मात्र, या अपघातामधून आपण समाज म्हणून काही शिकणार आहोत का, हा प्रश्न आहे. अपघात झालेला मुंबई-अहमदाबाद महामार्ग चौपदरी, काही ठिकाणी तिपदरी आणि पुलापाशी मात्र दुपदरी असा फरक का? रस्ते व महामार्ग रूंद करताना पूल तसेच का ठेवले जातात? जगातील केवळ दोन टक्के वाहने भारतात आहेत. मात्र, अपघात जगाच्या ११ टक्के होतात. यात केवढी मोठी मानवी संपत्ती आपण कायमची गमावतो आहोत. आपल्याकडे अद्ययावत व ताकदवान वाहने आली असली तरी ती जातात ते रस्ते व इतर सारे पर्यावरण त्या दर्जाचे नाही, याची जाणीव पुन्हा पुन्हा करून देण्याची गरज आहे. मोठे महामार्ग करून जबाबदारी संपत नाही. उलट ती वाढते. काही दिवसांपूर्वी विनायक मेटे यांचा असाच अपघाती मृत्यू झाला. त्या व या अपघाताची उच्चस्तरीय चौकशी सरकारने जाहीर केली आहे. मात्र, ही चौकशी केवळ या विशिष्ट अपघातांपुरती मर्यादित न राहता एकूण महामार्ग प्रवास कशा प्रकारे अधिक सुखरूप व सुरक्षित करता येईल, याचा विचार व्हावा. केवळ 'चालकाची चूक' या एका कारणावर जाऊन साऱ्या चौकशा थांबू नयेत. महामार्गांवरचा प्रवास सुरक्षित करण्यासाठी प्रयत्न झाले तर ती सायरस मिस्त्री यांना ती खरी आदरांजली ठरेल.

# आ.भरतशेठ गोगावले यांनी खा. सुनील तटकरे यांच्या तारास्ते बालेकिल्ल्याला जोरदार धक्का

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुक्यातील खांबोली व तारास्ते ग्रामस्थांचा शिवसेना शिंदे गटात प्रवेश करून. आम.भरतशेठ गोगावले यांनी खास.सुनिल तटकरे यांच्या बालेकिल्लयात सुरूंग लावला दिवसें दिवस शिवसेना शिंदे गटाचे वर्चस्व वाढताना दिसत आहे. आ.भरत शेठ गोगावले यांनी पहिल्या पासून तळा तालुक्यावर विशेष लक्ष दिले असल्याचे या पूर्वी विविध विकास कामांमधून पाहायला मिळालं आहे.





तळा तालुक्यात विकासकामांसाठी त्यांच्या मार्फत भरघोस निधी देऊन विकास केला आहे. त्यामुळे तळा तालुक्याची वाटचाल विकासाकडे होत आहे. तालुक्यातील तरुण मंडळी आणि ग्रामस्थ शिंदे गटात सहभागी होत आहेत. गावाचा विकास भरतशेठ गोगावले यांच्या मार्फत नक्की होईल असं ग्रामस्थांच मत आहे. आ.भरतशेठ गोगावले यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत आज खांबोली आणि तारास्ते येथील ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने गणरायाच्या आशिर्वादाने शिंदे गटात भरतशेठ गोगावले यांच्या उपस्थितीत प्रवेश केला. खांबोली गावांतील ठाकरे गटाचे शिवसैनिक जवळ पास दोनशे जणांनी शिंदे गटात जाहीर प्रवेश केला तर तारास्ते येथील ग्रामस्थांनी जवळपास पाचशे जणांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला रामराम करून शिंदे गटाचा झेंडा हातात घेतला.

आ.भरतशेठ यांनी संपूर्ण ग्रामस्थांचा पक्ष प्रवेश करून स्वागत केले. यावेळी संबोधीत करताना म्हणाले कि दोन्ही गावांसाठी निधीची कमतरता पडू देणार नाही. विकास कामे सुचवा उपेक्षित विकास केला जाईल असे आश्वासन दिले. या जम्बो पक्ष प्रवेशाने शिंदे गटाची ताकद वाढली आहे यावेळी दक्षीण जिल्हाध्यक्ष प्रमोद घोसाळकर, तळा तालुका प्रमुख प्रद्युम्न ठसाळ, शहर प्रमुख राकेश वडके, संपर्क प्रमुख अॅड.चेतन चव्हाण लिलाधर खातू, नमित पांढरकामे, नगरसेवक नरेश सुर्वे, भास्कर गोळे तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# आधारभूत किंमत धान खरेदी योजनेचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

किमान आधारभूत किंमत खरेदी योजना ही केंद्र शासनाची योजना असून शेतकऱ्यांना हमी भावापेक्षा कमी किंमतीने धान्य विकावे लागू नये, म्हणून ही योजना राबविण्यात येते. हंगाम २०१६-२०१७ पासून विकेंद्रीत खरेदी योजना संपूर्ण राज्यात राबविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

आधारभूत किंमतीचा शेतकऱ्यांना लाभ होण्याच्या दृष्टीने व त्यांना हमी भावापेक्षा कमी किंमतीने धान्य विकावे लागू नये, यासाठी राज्य शासनाने शेतकऱ्यांना लाभ मिळावा, या हेतूने राज्यात खरेदी केंद्र सुरु केली आहेत. रायगड जिल्ह्यात पणन हंगाम २०२०-२१ मध्ये ४० खरेदी केंद्रे मंजूर करण्यात आली होती. या खरेदी केंद्रावर २५ हजार ३४ शेतकऱ्यांकडून ४ लाख १० हजार ७५६ क्विंटल इतके धान खरेदी झाले होते. तर पणन हंगाम २०२१-२०२२ मध्ये ३८ धान खरेदी केंद्रांना मान्यता देण्यात आली होती. पणन हंगाम २०२१-२०२२ मध्ये २५ हजार ८३२ शेतकऱ्यांकडून ५ लाख ४९ हजार २७९.६४ क्विंटल इतकी धान खरेदी झालेली आहे. शासनाने पणन हंगाम २०२०-२०२१ व पणन हंगाम २०२१-२०२२ मध्ये खालीलप्रमाणे आधारभूत किंमत (हमी भाव) ठरवून दिली होती. पिक- धान/भात, दर्जा- साधारण, हंगाम २०२०-२१- आधारभूत किंमत- रु.१ हजार ८६८, शेतकऱ्यांना प्रत्यक्ष द्यावयाचा दर- रु.१ हजार ८६८ पिक- धान/भात, दर्जा- साधारण, हंगाम २०२१-२२- आधारभूत किंमत- रु.१ हजार ९४०, शेतकऱ्यांना प्रत्यक्ष द्यावयाचा दर- रु.१ हजार ९४० पिक- धान/भात, दर्जा- अ, हंगाम २०२०-२१- आधारभूत किंमत- रु.१ हजार ८८८, शेतकऱ्यांना प्रत्यक्ष द्यावयाचा दर- रु.१ हजार ८८८ पिक- धान/भात, दर्जा- अ, हंगाम २०२१-२२- आधारभूत किंमत- रु.१ हजार ९६०, शेतकऱ्यांना प्रत्यक्ष द्यावयाचा दर- रु.१ हजार ९६० कृषी विभागाने पणन हंगाम २०२०-२०२१ मध्ये एकरी १० क्विंटल उत्पादक क्षमता कळविली होती व त्यानुसार या हंगामात धान खरेदी करण्यात आली होती तर पणन हंगाम २०२१-२०२२ मध्ये १२.५० क्विंटल धान खरेदीची उत्पादक मर्यादा कळविल्यानुसार धान खरेदी करण्यात आल्याने धानाची खरेदी वाढली आहे. जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी सन २०२१-२०२२ मध्ये कृषी विभागाकडून शेतकऱ्यांची प्रति एकरी उत्पादक क्षमता वाढविल्याने व खरेदी केंद्रावर धान खरेदीचा ओघ वाढल्याने अधिकच्या धान साठवणुकीसाठी शासनातर्फे यापूर्वी असलेली वडखळ, नेरळ, कर्जत या गोदामाव्यतिरिक्त महाड, ता.महाड व मेढा ता.रोहा या ठिकाणी खरेदी केलेले अधिकचे धान्य साठवणुकीसाठी तातडीने गोदामे उपलब्ध करुन दिली. जिल्हाधिकारी डॉ.कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाने रायगड जिल्हयात एकूण २५ हजार ८३२ शेतकऱ्यांकडून ५ लाख ४९ हजार २७९.६४ क्विंटल इतकी धान खरेदी झालेली आहे. त्यामुळे जिल्हयातील शेतकऱ्यांना शेतीकरिता चालना मिळाली असून शेतीला लाभ झाला आहे. औद्योगिक क्षेत्र वाढले असूनसुध्दा शेतकऱ्यांचा शेतीकडे कल वाढत आहे. चालू वर्ष पणन हंगाम २०२२-२३ करिता शासनाचे आदेश प्राप्त होताच जिल्हाधिकारी डॉ.कल्याणकर यांच्या आदेशान्वये धान खरेदी केंद्र सुरु करण्यात येतील. जिल्हाधिकारी डॉ.कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा पणन अधिकारी श्री.केशव ताटे यांनी वेळोवेळी धान खरेदी केंद्र व धान भरडाई मिलर्स यांना भेटी देऊन धान खरेदीमध्ये सुसूत्रता आणली व धान खरेदी वाढविण्यास सहकार्य केले असल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके यांनी दिली आहे.

# प्रा.बबन जाधव आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कळंबोली येथील शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये महाविद्यालयातील प्राध्यापक एन .एस .एस. चे प्रमुख डॉ.बबन भिवसेन जाधव यांना मुंबई विद्यापीठाकडून आदर्श शिक्षक पुरस्काराने शिक्षक दिनी सन्मानित करण्यात आले आहे. विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.सुहास पेडणेकर यांच्या हस्ते शाल श्रीफळ स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले आहे . महाविद्यालयात सेवा बजावत असताना आव्हानात्मक संशोधन, एन एस एस च्या माध्यमातून केलेले विविध सामाजिक उपक्रम, सामाजिक जनजागृतीचे केलेले उल्लेखनीय कार्याबद्दल मुंबई विद्यापीठाकडून त्यांची आदर्श शिक्षक म्हणून निवड करण्यात आली आहे. विद्यापीठाकडून देण्यात येणारा हा सर्वोच्च मानाचा पुरस्कार मानला जात आहे.त्यांचे विविध स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.




डॉ.बबन भीमसेन जाधव हे कळंबोलीतील शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये कला शास्त्र व वाणिज्य महाविद्यालयात गेले अनेक वर्षापासून शिक्षण देण्याचे कार्य करीत आहेत. शैक्षणिक कार्य करीत असताना विविध विषयावर संशोधन करून त्यांनी त्यांचे कार्याचा ठसा राज्य व केंद्र स्तरावर उमटवला आहे. देश पातळीवरील विविध चर्चासत्रात त्यांनी सहभाग घेऊन आपली संशोधन वृत्ती कायम जोपासली आहे .विद्यार्थ्यांमध्येही एन.एस.एस.च्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक कार्याची आवड निर्माण करण्याचे काम ते करीत आहेत. त्यांनी केलेल्या उल्लेखनीय शैक्षणिक कार्याची दखल मुंबई विद्यापीठाने घेऊन त्यांना पाच सप्टेंबर या शिक्षक दिनी मुंबई विद्यापीठाच्या भव्यदिव्य सोहळ्यात आदर्श शिक्षक म्हणून सन्मानित करण्यात आले आहे .रोख रक्कम ५००० रुपये, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन त्यांना मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.सुहास पेडणेकर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. मुंबई विद्यापीठाने आदर्श शिक्षक म्हणून सन्मानित केल्यानंतर डॉ. बबन जाधव यांचे सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व शैक्षणिक स्तरातून अभिनंदन केले आहे जात आहे .संस्थेचे अध्यक्ष वसंत ओसवाल, उपाध्यक्ष रवींद्र लिमये ,कार्यवाह गीता पालरेचा ,सचिव रविकांत घोसाळकर, प्राचार्य राजेंद्र पालवे व अन्य पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. त्यांना मिळालेल्या रोख रकमेच्या पारितोषिकांमध्ये स्वतःचे पाच हजार रुपये जमा करून ते कायम निधी म्हणून ठेवून त्यातून येणाऱ्या व्याजातून दरवर्षी बक्षीस वितरित केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

# खारघर क्षेत्रातील टोलनाक्यावरील टॉयलेट सुरु करण्याची शिवसेनेची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर क्षेत्रातील टोलनाक्यावरील टॉयलेट सुरु करण्याची शिवसेना रायगड-पनवेल जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

शिवसेना रायगड- पनवेल जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या वतीने खारघर शिवसेना शहरप्रमुख गुरुनाथ पाटील व इतर पदाधिकार्यांनी संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेऊन खारघर क्षेत्रातील टोलनाका या ठिकाणी असणारे टॉयलेट चालू असलेले बंद करण्यात आलेले आहे. त्यामुळे नागरिकांना समस्या निर्माण झालेली आहे. सदरबाब त्या ठिकाणावरुन वाहतूक करत असता, टॉयलेटची व्यवस्था बंद असल्याने, नागरिकांना समस्या निर्माण झालेली आहे. तरी सदर ठिकाणी बंद असलेले टॉयलेट चालू करण्यात यावे व नागरिकांच्या समस्येचे निराकरण करण्यात यावे. अशी मागणी यावेळी त्यांनी केली आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## रायगडातून काँग्रेसचे तीन आमदार देणार : महेंद्रशेठ घरत

महेंद्र घरत यांच्या सततच्या व्यस्त कार्यक्रमामुळे काँग्रेस पक्षाला सुगीचे दिवस आल्याची चर्चा जनमानसात दिसून येते. रायगड जिल्ह्यात काँग्रेस पक्ष ग्रामपंचायत स्तरापासून झपाट्याने वाढत आहे. आज मीतिला रायगड जिल्ह्यात काँग्रेसचा एकही आमदार नसला तरी महेंद्र घरत यांच्या राज्य तसेच राष्ट्रीय स्तरावरील नेत्यांच्या ओळखीमुळे जिल्ह्यातील कार्यकर्त्यांची कोणतीही कामे मंत्रालयातून करून आणण्यात महेंद्र घरत यशस्वी झाले आहेत. सर्वसामान्य नागरिकांची अथवा कार्यकर्त्यांची सरकारी पातळीवरील कामे असो किंवा पोलीस ठाण्यातील कामे असो त्याचबरोबर शेकडो तरुणांच्या रोजगाराचा प्रश्न असो असे अनेक प्रश्न महेंद्र घरत यांनी चुटकी सारखे सोडवले आहेत. महेंद्र घरत यांच्या रूपाने रायगड जिल्हा काँग्रेसला एक खंबीर तसेच कार्यक्षम नेतृत्व मिळाले आहे यात कोणालाच दुमत असण्याचे कारण नाही. यापुढेही त्यांचीही यशस्वी घोडदौड कायम राहील यात शंका नाही.त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!

## सर्वसामान्य जनतेची सेवा हाच आमचा वसा : खा.सुनील तटकरे

दुर्लक्षित आणि अपूर्ण अवस्थेत असलेल्या खरसई धरणाचे काम पुर्ण व्हावे यासाठी ग्रामस्थांना उपोषण करावे लागले होते त्यावर योग्य मार्ग काढून कामाला गती देण्यात आली. खरसई धरण हे एम.आय.ट्यांक पद्धतीचे आसुन ते जलसंधारण विभागाकडे वर्ग आहे.तत्कालीन वेळी आपण जलसंपदामंत्री असताना या धरणाचे प्रलंबीत कामासाठी ५ कोटी रुपयांचे निधीची तरतूद करून ते पूर्ण केले असल्याची उपस्थितांना आठवण करुन दिली. 'मापत पाप नाही आणि हिशोबत खोट नाही'एकदा का शब्द दिला तर तो पुर्ण करणारच असा खुलासा खासदार सुनिल तटकरे यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केला. तोंडसुरे, बनोटी, खारगाव खुर्द, रेवळी या चार ग्रामपंचायती मधील ८ गावे आणि ११ वाडीचे लोकवस्ती असलेल्या गावांना खरसई धरणखालील उद्भव विहिरीतून दरडोई ५५ लीटर शुद्ध पाणी पुरवठा होणार आहे. हर घर जल अशी घोषणा करून ती वर्षभरात नळाचे योजनेद्वारे वितरित करण्यात येणार आहे. जलजीवन योजने अंतर्गत सदरची योजना भारत सरकार आणि राज्य सरकारच्या माध्यामातुन संयुक्तपणे राबवली जात आहे यात ५०% राज्य शासनाचा सहभाग आहे.म्हसळा तालुक्यात अशा प्रकारे १०० कोटी रुपये रकमेच्या योजना मंजुर करण्यात आल्या असल्याचे सांगताना केंद्र आणि राज्य सरकारने निकष ठरवले तेव्हा आघाडी शासनाचे कालावधित उद्धवजी ठाकरे मुख्यमंत्री होते तेव्हा त्यांचे मंत्रिमंडळात रायगडच्या पालकमंत्री आदिती तटकरे यांचे अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील ७ विधानसभा मतदासंघातील योजनांची जबाबदारी त्यांचेवर देण्यात आली होती असाही खुलासा खासदार तटकरे यांनी केला.तोंडसुरे प्रादेशिक नळ पाणी पुरवठा जुण्या योजनेला ३० वर्षाहुन अधिक कालावधी लोटला असल्याने ती सदोष झाली आहे. तत्कालीन वेळी पालकमंत्री,जलसंपदा मंत्री असताना नादुरुस्त झालेले पाभरे धरण,कुडकी धरण,कुडकी धरण दुरुस्तीसाठी १६.५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याने आज धरणाचे परिसरात शे,दोनशे हेक्टर जमीन ओलिखाली येवुन हवे ते दुबार पीक घेतले जाते तसेच गाववाड्याना पिण्याचे पाण्याची उपलब्धता करून दिली असल्याचे खासदार सुनिल तटकरे यांनी मनोगातून व्यक्त केली.तोंडसुरे पंचक्रोशीतील पाणी टंचाईचे दुर्मिक्ष कायमस्वरूपी संपण्यासाठी खरसई धरण प्रकल्पामधून नवीन योजना मंजुर करण्यासाठी रायगडचे खासदार सुनिल तटकरे,पालकमंत्री आदिती तटकरे यांनी शासनाकडून जलजिवन मिशन योजने अंतर्गत १०.३३ कोटी रुपयांची मंजुरी मिळवुन देण्यात यश प्राप्त केले या योजनेचा प्रारूप आराखडा तयार करण्याचे काम एनजेएस इंजेनिअर्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने केले.योजना प्रकल्प सल्लागार म्हणुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मध्ये काम केलेले माजी अधिकारी डी.के.महाजन यांनी प्रारूप आराखडा तयार करण्याचे कामाला गती दिली.सन २०२३ ची जनगणना लक्षात घेता ९१५३ लोकसंख्या असलेल्या तोंडसुरे पंचक्रोशीतील गाव वाडीना दरदिवशी ९२२ दश लक्ष लीटर पाणी पुरवठा होणार आहे.प्रत्येक गाव निहाय स्वतंत्र साठवण टाकी असल्याचे महाजन यांनी सांगीतले.कार्यक्रमाला पक्ष प्रदेश सचिव अलीशेट कौचाली,म.जीवन प्राधिकरण अभियंता कदम,पी.आय.उद्धव सुर्वे, प्रकल्प सल्लागार महाजन,तालुका अध्यक्ष समीर बनकर,समिती अध्यक्ष महादेव पाटील,उपाध्यक्ष मनोज नाक्ति,सचिव स.भी.पवार,सरपंच वनिता खोत,सरपंच इरशाद फकिह,सरपंच स्मिता जंगम,उप सरपंच उमेश नाक्ती,रियाजभाई फकिह,सरपंच अनंत कांबळे,सरपंच निलेश मांदाडकर,माजी सरपंच भिकु पाटील,प्रकाश गाणेकर,शेखर खोत,अनिल टिंगरे,भालचंद्र गाणेकर,अनंत पाटील,सुधाकर जंगम,विठोबा पवार,माजी सरपंच मीना टिंगरे,शिला पवार,ज्योती नाक्ती,माजी सरपंच सुरेश महाडीक,अंकुश गाणेकर,मनोहर पाटील,महादेव म्हात्रे आदी मान्यवांसह पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंकुश गाणेकर यांनी तर स्वागत,प्रास्ताविक व आभार समिती अध्यक्ष महादेव पाटील यांनी केले.

# मुरुड तालुक्यातील कुणबी समाजाचा विधवा प्रथा बंद करण्याचा ऐतिहासिक निर्णय

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

रायगड जिल्ह्यातील मुरुड जंजिरा विभागातील कुणबी समाजोन्नती संघ मुरुड-जंजिरा येथील पंचक्रोशीतील नांदले, चिंचघर, उसडी-चाफेगाव, जमृतखार, सावली, मिठागर या गावातील समाज बांधवांची सालाबादप्रमाणे गौरी गणपती सण व ७५ व्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त संयुक्त सभा दि. २ सप्टेंबर २०२२ रोजी मौजे नांदले येथे संपन्न झाली. या सभेत कुणबी समाजातील सामाजिक भान जपून व कर्तव्य मानून समाजपयोगी विकासात्मक विषयांवर चर्चा होऊन विधवा प्रथा बंद करणे संदर्भात महाराष्ट्र शासन परीपत्रक दि. १७ मे २०२२ तसेच दि. १४ जून २०२२ चे मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद अलिबाग यांनी गट विकास अधिकारी पंचायत समिती मुरुड यांनी पाठविलेल्या पत्राचे वाचन करून समाजात प्रचलित असलेली अनिष्ट विधवा प्रथा बंद करून ऐतिहासिक निर्णय घेतला. या निर्णयाचे समाजातील सर्व समाजबांधवाने एकमतानी ठराव मंजूर करून समाजासमोर आदर्श ठेवला. या सभेत समाजातील जेष्ठ व्यक्ती व समाज बांधवांनी या विषयावर आपले मत मांडून या क्रांतिकारी निर्णयाचे स्वागत केले व समाजाला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या प्रथेअंतर्गत पूर्वापार चालत असलेल्या पतीच्या निधनावेळी पत्नीच्या कपाळावरील कुंकू पुसणे, मंगळसूत्र तोडणे, बांगड्या फोडणे, जोडवी काढणे किंवा विधवा म्हणून हिणवणे तसेच धार्मिक कार्यक्रमात प्रवेश नाकारणे यासारख्या अनिष्ट प्रथामुळे स्त्रियांच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर बंधने लादली जात आहे. या अमानवी प्रथा, परंपरा बंद करून स्त्रियांना एक व्यक्ती म्हणून अधिकार मिळावेत असा असा ठराव सर्वानुमते ठराव मंजूर केला.

ही प्रथा धार्मिक आणि भावनिक जरी असली तरी समाजामध्ये परिवर्तन घडवून आणणे ही काळाची गरज आहे. आपला देश विज्ञान वादी व प्रगतिशील समाज म्हणून वाटचाल करीत आहे. तरी अशा महिलांना इतर महिलांप्रमाणे सन्मानाने जगण्याचा पूर्ण अधिकार आहे. यामुळे अशा प्रथेचे निर्मूलन व्हावे हे नक्कीच कौतुकास्पद आहे. या सभेच्या निमित्ताने समाजातील सर्व स्तरांवर या निर्णयाची अंमलबजावणी व्हावी असे उपरोक्त समाजाच्या वतीने आवाहन करण्यात आले.

यावेळी ग्रामीण विभाग अध्यक्ष संतोष पाटील व मुंबई विभाग अध्यक्ष मंगेश पाटील, ग्रामीण सचिव सचिन पाटील तसेच मुंबई व ग्रामीण कार्यकारिणी, कार्यकर्ते, सक्रिय समाज बांधव या सभेला उपस्थित होते. या ऐतिहासिक निर्णयाचे पंचक्रोशीतील सर्व नागरिकांतून उत्स्फूर्त स्वागत होत आहे.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# शिवसेना शहर शाखा माथेरान यांच्या वतीने आयोजित घरगुती गणेश सजावट स्पर्धेत शंकर तांबे प्रथम स्थानावर

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान सारख्या दुर्गम भागात आजही विविध सणांना,उत्सवांना स्थानिक लोक आपापल्या परीने योगदान देत असतात.त्यातच सर्वांचा आवडता सण म्हणजे गणेशोत्सव आणि याच सणांच्या निमित्ताने गणेश सजावट स्पर्धेचे आयोजन वनसंरक्षक समितीचे अध्यक्ष योगेश जाधव यांच्या संकल्पनेतून त्याचप्रमाणे शिवसेना शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी यांच्या माध्यमातून हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे शिवसेना शहर शाखा माथेरान यांच्या वतीने गणेशोत्सव २०२२ निमित्ताने घरगुती सजावट स्पर्धा आयोजन करण्यात आले होते. माथेरान मधील गणेशोत्सवाचे हब असलेल्या संत रोहिदास नगर मध्ये या स्पर्धे ला उत्तम प्रतिसाद लाभला शिवसेना शहर शाखेच्या वतीने योगेश जाधव व निखिल शिंदे यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन अनेक ठिकाणी गणेश सजावटी बाबतीत सर्वेक्षण व परीक्षण केले असता संत रोहिदास नगर येथील शंकर तांबे यांनी महाभारतातील पौराणिक देखावा भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितलेला गीतासार व आपल्या विश्वरूपाचे दिलेले दर्शन साकार केले आहे.माथेरान सारख्या अतिशय प्रतिकूल परिस्थितीत ही सजावट तांबे कुटुंबातील सदस्यांनी केली आहे.त्यांनी केलेल्या या अप्रतिम सजावटीसाठी प्रथम क्रमांक पटकावला



आहे,द्वितीय क्रमांक संदीप सोनवणे यांनी १९९० च्या दशकात टेलिव्हिजनवर सुरू असलेल्या विक्रम वेताळ हा देखावा सादर केला असून त्यामधील साऊंड व चलचित्राचे टायमिंग वाखाणण्याजोगे आहे. तसेच तृतीय क्रमांक याच भागातील वैभव पवार यांनी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव हा देखावा उत्तम प्रकारे साकारला असून यामध्ये भारतीय तिरंग्याच महत्व , स्वातंत्र्य वीरांच्या आहुती, अमर ज्योत , याविषयी या देखाव्यातून प्रबोधन करणेत आले आहे विशेष म्हणजे ह्या देखाव्यात कुठंही थर्माकोलचा वापर करणेत आलेला नाही. सर्व विजेत्यांचे शिवसेना शहर शाखा माथेरानच्या वतीने मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले आहे.

वाढत्या महागाईत सुध्दा वार्षिक मोजक्याच दिवसांत रोजगार उपलब्ध करणारी इथली श्रमिक,कष्टकरी मंडळी सण उत्सव मोठया आनंदाने साजरे करतात.त्यांच्या अंगी असणारे गुण, कलाकौशल्य याचे दर्शन गणेशोत्सव काळात पहावयास मिळते. त्यांच्या कलेला दाद मिळाली पाहिजे यासाठी नेहमीच सामाजिक,शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रात अग्रेसर भूमिका बजा-वणारा माथेरान शिवसेना पक्ष सध्याच्या घडीला आघाडीवर आहे. हिंदुहृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे,शिवसेना शाखेच्या वतीने उत्कृष्ट गणेश सजावटीसाठी रोख रक्कम जाहीर करण्यात आली होती त्याप्रमाणे येथील उत्साही लोकांनी आपापल्या प्रामाणिक प्रयत्न केले आहेत त्यास खरोखरच दाद द्यावी लागेल, असे वनसंरक्षण समिती अध्यक्ष योगेश जाधव यांनी म्हटले आहे.

# रोहा शेतकरी मंचाकडून जमिनींवर वने शेरा संदर्भात खा. सुनील तटकरेंना निवेदन

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतजमीन मिळकतीच्या सातबारा उताऱ्यावर महाराष्ट्र शासन राखीव वने तसेच वने असे शेरे आहेत, हे शेतकऱ्यांच्या जमिनींवर नाहक लागलेले शेरे कमी करून मिळावेत असे निवेदन रोहा शेतकरी सभेच्या तक्रार निवारण मंचाकडून रायगडचे खासदार सुनील तटकरे देण्यात आले. धानकान्हे या गावी विकास कामांचे भूमिपूजन प्रसंगी हे निवेदन देण्यात आले. यावेळी शेतकरी तक्रार निवारण मंच सचिव जगदीश हिरामण जाधव, विश्वनाथ जाधव, मनोज कान्हेकर, संदेश गायकवाड आदींसह शेतकरी तक्रार निवारण मंचाचे पदाधिकारी उपस्थित होते.

रोहा तालुक्यातील लागवडीखालील क्षेत्र व इतर पिकाखालील जमिनीवर महाराष्ट्र शासन राखीव वने तसेच वने असे लागलेले शिक्के आणि शेरे अतिशय चुकीचे असून कोणत्याही प्रकारची शहानिशा किंवा प्रत्यक्ष पाहणी तसेच वनक्षेत्र नसताना जाणून-बुजून लावले गेले आहेत. शासनाने कूळ कायद्यानुसार राहील त्याचे घर व कसेल त्याची शेती यानुसार शेतकऱ्यांना जमिनी दिल्या. या कुलकायदा प्राप्त जमिनीचे हप्तेही शेतकऱ्यानी भरले. असे असताना तत्कालीन महाराष्ट्र शासनाने १९७५ साली खाजगी वनसंपदा कायदा आणून कुळ कायद्यानुसार ज्यांना जमिनी मिळाल्या त्यातील बऱ्याचशा जमिनींवर महाराष्ट्र शासन राखीव वने असे शेरे मारून तालुक्यातील शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचे काम केले आहे.

रोहा तालुक्यातील शेतकरी सभा व तक्रार निवारण मंचाचे सचिव जगदीश जाधव गेली वर्षभर शेतकऱ्यांना न्याय मिळावे म्हणून प्रयत्न करीत आहेत. त्यांच्या या काम करण्याच्या तळमळीमुळे तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांनी त्यांना पाठिंबा दर्शविला आहे. आता शेतकरी राजा जागा झाला आहे, फुकट जमीनी बळकावून देणार नाही. शेतकऱ्यांच्या जमिनींवर नाहक टाकलेले वने शेरे शेतकऱ्यांची डोकेदुखी ठरत आहे. त्यामुळे हे नाहक लागलेले शेरे लवकरात लवकर काढावेत यासाठी तक्रार निवारण मंच आक्रमक झाले आहे.महत्वाचे म्हणजे ज्या जमिनीची शासनास शिफारस केली, तीच मुळात चुकीचे आहे. खाजगी वनसंपदा कायद्यानुसार १२ हेक्टरपेक्षा कमी जागेला वने हा शिक्का लावता येत नाही. तसेच वने हा शेरा मारताना लागवडीखालील क्षेत्र वगळणे बंधनकारक आहे व कमी क्षेत्राला वने लावता येत नाही. असे असताना वनविभागाचे सर्वेअर तसेच महसूल विभागातील तहसीलदार, सर्कल, तलाठी यांनी कोणतीही खातरजमा व शहानिशा न करता लागवडीखालील भात शेती व कमी क्षेत्राला वने चे शिक्के मारून शेतकऱ्यांना जीवनातून उठविण्याचे तसेच देशोधडीला लावण्याचे काम केले.

रोहा तालुका शेतकरी सभा तक्रार निवारण मंच या शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी लढणाऱ्या संघटनेकडून वनविभागाच्या तसेच महसूल विभागाच्या संदर्भात माहिती घेऊन महाराष्ट्र शासन राखीव वने तसेच वने हे शिक्के कमी करून शेतकऱ्याचे सातबारे कोरे करावेत म्हणून आक्रमक पवित्रा घेतला आहे. शेतकऱ्यांवरील अन्याय दूर करून शेतकऱ्यांचे सातबारे कोरे करावेत अशी मागणी शेतकरी सभा तक्रार निव-ारण मंचच्याकडून होत आहे. शासनाकडून योग्य व न्याय्य कार्यवाही होऊन शेतकऱ्यांना दिलासा मिळेल असे देशाचा पोशिंदा शेतकरी हा अपेक्षा करत आहे. शेतकरी तक्रार निवारण मंचाकडून शेतकऱ्याच्या जमिनींवर नाहक लागलेले महाराष्ट्र शासन राखीव वने हे शिक्के या निवेदनाचा विचार करून लवकरात लवकर हटविण्यात यावे असे आवाहन शेतकऱ्यांवरील होणाऱ्या अन्यायाविरुद्ध कृषि विकास पर्यावरण रक्षण व समतावादी समाजाचे निर्मितीसाठी तयार केलेले तक्रार निवारण मंच शेतकरी सभा यांनी दिले आहे.

# रोहयात ९० जणांची नेत्र तपासणी ; ४५ मोतीबिंदू रुग्णांना शास्त्रकियेसाठी पाठविले

**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहा येथिल नेत्र रुग्ण तपासणी शिबिरात मंगळवारी ९० रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ४५ रुग्णांना आजच आर झुनझु-नवाला शंकरा आय हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रियेसाठी पाठवण्यात आले. गेल्या तीन महिन्यांत रोहा सिटिझन फोरम ट्रस्टच्या माध्यमातून तब्बल २०६ नेत्ररुग्णांना नवी दृष्टी मिळाली आहे. रोहा सिटिझन फोरमचा अंधत्वा कडून दृष्टीकडे मोतीबिंदू मुक्त रोहा अभियान कमालीचे यशस्वी झाले आहे.

रोहा सिटिझन फोरम ट्रस्ट आणि आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल, नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले. शासकीय विश्रामगृह दमखाडी, रोहा येथे झालेल्या या शिबिरात अल्पदरात चष्मे वाटप, आणि मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू ऑपरेशन शिबिर पार पडले.

हॉस्पिटलचे टीम मॅनेजर प्रकाश पाटील, डॉक्टर संदेश रसाळ, नंदिनी देवधरकर, अश्विनी पाटील, राजदीप कौर, गायत्री, नरेश आवलर, ज्ञानोबा कांबळे आदींनी रुग्णांची तपासणी केली.

रोहा सिटिझन फोरम ट्रस्ट चे अध्यक्ष नितीन परब, निमंत्रक प्रदिप देशमुख, अहमदशेठ दर्जी, उस्मानभाई रोहेकर, महेश सरदार, संदीप सरफळे, इल्यास डबीर, दिनेश जाधव, शैलेश रावकर, सचिन शेडगे, अमोल देशमुख, प्रशांत देशमुख, निलेश शिर्के, राजेश काफरे, सिद्धेश ममाले, दिनेश मोहिते, समिधा अष्टिवकर, भावेश अग्रवाल, शंतनू अष्टीवकर आणि फोरम च्या सर्व सदस्यांनी शिबीर यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

रोहा सिटीझन फोरम ट्रस्टचे अध्यक्ष नितिन परब यांनी सहयोगी संस्थांचे आणि शिबिरासाठी परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

# पनवेल तालुक्यातून तरुणी बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील इंडियाब्ल्यू, कोन गाव येथे राहणारी एक तरुणी कोणास काही एक न सांगता कोठे तरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. प्रियंका माया शेख असे या मुलीचे नाव असून उंची ५ फूट, रंग गोरा, केस गोल्डन कलर केलेले, डोळे काळे, नाक लांब सरळ, बांधा माध्यम असून कानामध्ये दोन ठिकाणी पिवळ्या धातूच्या रिंगा घातलेल्या आहेत तसेच पायात चप्पल आहे.



**पनवेलमध्ये ६२ वर्षाची परंपरा असलेल्या माजी नगराध्यक्ष मदन तुकाराम कोळी यांच्या घरगुती गणे-शोत्सवात द्वारका माईचा दीपोत्सवाचा देखावा सादर केला आहे. धार्मिक, सामाजिक, पौराणिक अशा वेगवेगळ्या विषयांवर चलचित्रांचे देखावे सादर करून दरवर्षी आपला गणेशोत्सवाचा वारसा मदन तुकाराम कोळी कुटुंबीय जपत आले असून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सदिच्छा भेट देऊन श्री गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी कोळी कुटुंबियांनी त्यांचे स्वागत केले.**

**सर्व प्रकारच्या जाहिरातींचे उत्तम माध्यम**
**दैनिक रायगड नगरी**
**9619979706 / 9619737911**

**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

## CHANGE OF NAME

My old Name was **Sharddha Santosh Patil** As per Gazzete No.(M-2287348), I will be known as **Purna Santosh Patil (New Name)** R/at, House No.504 (4), At-Post-Shirdhon, Tal-Panvel, Dist-Raigad, 410206

**Purna Santosh Patil**
**(Sd/- New Name)**

---

अर्जदारातर्फे वकील
ॲड.प्रज्वल ध्रुव गायकवाड

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर साहेब यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.८१८/२०२२
नि.नं.१५/ड
ने.ता.१०/१०/२०२२

श्री.निखील केदू यशवंते — अर्जदार
विरुद्ध
श्री.वैभव केदू यशवंते
व
श्री.अश्विन केदू यशवंते — गैरअर्जदार

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाचे निवासी सदनिका आहे. सदर निवासी सदनिकेचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : रुम नं.बी-२०३, २ रा मजला, शिव कल्पतरु आर्केड, बिल्डींग नं.४, प्लॉट नं.०१, सेक्टर-१७, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड**

मयत श्री.केदू दगू यशवंते यांचे दि.२१/०७/२०२१ रोजी खारघर, पनवेल येथे निधन झाले असून त्यांना श्री.निखील केदू यशवंते, रा.रुम नं.बी-२०३, २ रा मजला, शिव कल्पतरु आर्केड, बिल्डींग नं.४, प्लॉट नं.०१, सेक्टर-१७, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड

सबब अर्जदार हेच मयत श्री.केदू दगू यशवंते यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांनी मयत श्री.केदू दगू यशवंते यांच्या मृत्यूपश्चात वारस दाखला मिळणेसाठी मे.दिवाणी न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करण्यासंबंधी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी त्यांचे वकीलांमार्फत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात सादर करावी. विहित मुदतीत हरकत सादर न केल्यास मे.न्यायालय योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. तसेच मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.६/०९/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

## जाहीर नोटीस

**उपविभागीय अधिकारी पनवेल उपविभाग पनवेल यांच्या न्यायालयात**

On Admission
टेनन्सी/अपिल क्र...../२०२२

१) श्री.बाळाराम रामा पाटील २) श्रीमती.गंगुबाई चंदर पाटील
३) श्रीमती.मंदाबाई रवींद्र कादळेकर
४) श्रीमती.रंगुबाई नागो हजारे
५) श्रीमती.फशीबाई संजय ठाकूर
६) श्रीमती.ताईबाई मोतीराम हजारे
सर्व रा.नागझरी, ता.पनवेल — वादी
विरुद्ध
१) आजीम इब्राहीम नावडेकर २) महंमदसाले इब्राहीम नावडेकर
३) इकबाल इब्राहीम नावडेकर ४) सईदा हनिफ सुभेदार
५) नदीम अब्दुल अजिज डोलारे
६) कुददुस अब्दुल अजिज डोलारे
७) माईलला इसाक शेख कर्णेकर ८) माईअरस अल्ली खान
९) आजरा रऊफ पटेल १०) नुरजहा मुजाफर लोंढे
क्र.१ ते १० रा.कच्छी मोहल्ला, पनवेल
११) श्री.नागो गोपाळ पाटील १२) श्री.गोपाळ बाबु काठे
१३) श्री.राघो बारक्या निघुकर १४) श्री.भुऱ्या नामा पाटील
क्र.११ ते १४ रा.नागझरी, ता.पनवेल — प्रतिवादी

तमाम जनतेस तसेच सामनेवाले यांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार मौजे : नागझरी, ता.पनवेल, जि.रायगड येथील स.नं.१३/१ झ बाबत मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ७४ नुसार अप्पर तहसीलदार व शेत जमीन न्यायाधिकरण पनवेल यांचेकडील ३२ ग नागझरी/६१ दिनांक १८/१०/१९६४ व दुरुस्ती हुकूम नं.३२ग/ नागझरी/३७३ दिनांक २४/११/१९६५ रोजी झालेल्या आदेशाविरुद्ध अपिल या कार्यालयात दाखल केले आहे. सदर अपिलामध्ये वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. प्रस्तुत अपिलाच्या सुनावणीकामी सानमवोले या न्यायालयात सुनावणी कामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी ही दि.१२/०९/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता निश्चित करण्यात आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले यांनी तसेच वरील जमीन मिळकतीशी संबंधित असलेल्या व्यक्तींनी २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कार्यालय पनवेल, जि.रायगड येथे समक्ष येवून आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्या सहलेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहित केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नागझरी, ता.पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| १३ | १ झ | ०.२९.४० पो.ख.०.१७.०० | ६.०० |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.
ठिकाण : पनवेल
दिनांक : २२/०७/२०२२

**सही/-**
**उपविभागीय अधिकारी पनवेल**
**उपविभाग पनवेल**

---

मे.मुजावर सो
ॲड.प्रदीप भोईर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१२९७/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२०/१०/२०२२

१) श्रीमती.जोमी गोमा चौधरी
वय : ६५ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.नागेश गोमा चौधरी
वय : ४२ वर्षे, धंदा : शेती
३) श्री.सोपान गोमा चौधरी
वय : २९ वर्षे, धंदा : शेती
क्र.१ ते ३ रा.चांदणेवाडी-हेदुटणे,
ता.पनवेल, जि.रायगड
४) श्रीमती.मंदा मंगळ्या उघडा
वय : ३२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.हेदुटणे, ता.पनवेल, जि.रायगड
५) श्रीमती.मंगळी महादेव मधे
वय : ३४ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.वाघऱ्याची वाडी-टेंभोडे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ यांचे पती, अर्जदार क्र.२ ते ५ यांचे वडील मयत गोमा उर्फ जोमा कमळ्या चौधरी हे दि.०३/०५/१९९० रोजी मौजे : चांदणेवाडी-हेदुटणे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. मयत गोमा उर्फ जोमा कमळ्या चौधरी यांच्या सामाईक नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : हेदुटणे, ता.पनवेल, जि.रायगड**

| गट नं./स.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आ.पॉ.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ४७ | ई | ०-२१-०० पो.ख.०-०४-१० | ०.५६ |
| ४९ | १ | ०-३३-६० पो.ख.०-०१-०० | ७.६९ |

अर्जदार यांनी सदरील चौकशी अर्ज मयत गोमा उर्फ जोमा कमळ्या चौधरी यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषित करून मिळणेकरिता दाखल केला आहे. सबब सदरील चौकशी अर्जाचे कामी अर्जदार यांचे क्लेम संबंधात जमर कोणाचीही कसलीही हरकत असल्यास सदरची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात दाखल करावी. विहित मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभांत वारस दाखला प्रदान करण्यात येईल हे सर्व कळावे.

ही नोटीस आज दि.२/९/२०२२ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.मुजावर साहेब कोर्ट
अर्जदारातर्फे वकील
ॲड.वर्षा पाटील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१२०९/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१४/०९/२०२२

१) श्री.योगेश शांताराम पाटील
वय : ४४, धंदा : शेती
२) श्री.प्रमोद शांताराम पाटील
वय : ३९, धंदा : शेती
३) श्री.विरेश शांताराम पाटील
वय : ३८, धंदा : शेती
रा.सर्व १ ते ३, मु.वलप, ता.पनवेल,
पो.पडघे, जि.रायगड
४) कु.योगिता शांताराम पाटील (लग्नाआधी)
सौ.योगिता अशोक पाटील (लग्नानंतर)
वय : ४५, धंदा : गृहिणी
रा.१०६, मारुती मंदिर टेंभोडे,
कळंबोली, टेंभोडे, रायगड
५) कु.प्रमिला शांताराम पाटील (लग्नाआधी)
सौ.प्रमिला दिपक पाटील (लग्नानंतर)
वय : ४३, धंदा : गृहिणी
रा.तोंडरे, ग्रामपंचायत ऑफिस जवळ,
तोंडरे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी कै.नर्मदा शांताराम पाटील ह्या मु.वलप, ता.पनवेल, जि.रायगड येथील कायमचे रहिवासी होत्या व त्या दि.२१/०१/२०२१ रोजी मु.वलप, ता.पनवेल, पो.पडघे, जि.रायगड ४१०२०६ येथे मयत झाल्या आहेत. त्याअर्थी सदर अर्जदार क्र.१ ते क्र.५ यांनी ते कै.नर्मदा शांताराम पाटील यांचे खालील वर्णन केलेल्या मिळकतीत त्यांच्या असलेल्या हिश्श्याबाबत वारस असलेबाबतचा वारस दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

**कै.नर्मदा शांताराम पाटील यांचे मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पेंधर, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्र. | गाव | युनिट केस नं. | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|---|
| १ | ओवे | १४५ | २५७ | ३ | ३-१-५ |

त्याअर्थी अर्जदार क्र.१ ते क्र.४ हे मयत कै.नर्मदा शांताराम पाटील यांचे वारसदार आहेत, या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या कोर्टात एक महिन्याच्या आत हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत नाही आली तर हे कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेण्याची कार्यवाही करील आणि ते जर कै.नर्मदा शांताराम पाटील यांचे वारस असल्याचे शाबित झाल्यास त्यास वारसदाखला मंजूर करील, याची दखल घ्यावी.

आज दि.६/९/२०२२ रोजी माझी सही, न्यायलयाच्या शिक्क्यासह दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# रहाटाड कोळीवाडा ग्रामस्थांचा भाजपमध्ये प्रवेश



**दै.रायगड नगरी । तळा**

तळा किशोर पितळे स्थानिक स्वराज संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकारणात मोठ्मोठ्या उलाढाली होत असून तळा तालुक्यातील रहाटाड हा राष्ट्रवादीचा बालेकिल्ला समजला जातो गेले कित्येक वर्ष राष्ट्रवादीची ग्रामपंचायतवर सत्ता आहे. तसेच नगरपंचायत पंचायत समिती जिल्हा परिषद गट गटातून राष्ट्रवादीचे उमेदवार निवडून गेले आहेत असे असताना रहाटाड कोळीवाडा समाजाने भारतीय जनता पक्षामध्ये जाहीर प्रवेश करून महाराष्ट्र प्रदेश सचिव रवि मुंढे यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून पक्ष प्रवेश केला आहे.

राष्ट्रवादी पक्षाकडून वारंवार अंतर्गत कुरघोडीमुळे वरीष्ठा कड्न दखल घेतली जात नसल्याने काही दिवसांपूर्वी रहाटाड सरपंचासह अनेक जणांनी भाजप मध्ये प्रवेश केला होता. आज गणेशोत्वाचे औचित्य साधून मुबईकर मंडळींनी व ग्रामस्थांनी पक्ष प्रवेश करून राष्ट्रवादीला जोरदार झटका दिला. यावेळी महाराष्ट्र प्रदेश सचिव रविभाऊ मुंढे, तळा तालुका मंडळ अध्यक्ष ॲड.निलेश रातवडकर, तालुका सचिव खेळु वाजे, उपाध्यक्ष किशोर वेदक, तालुका सचिव सुरेश भाटे, शहर अध्यक्ष लहु चव्हाण, नगरसेवक तथा युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस रितेश रवि मुंढे, युवा मोर्चा जिल्हा सचिव प्रशांत सकपाल, सरपंच चांगदेव रामा पाटिल, उपसरपंच अशोक नारायण खंडागळे, रहाटाड बुथ अध्यक्ष मंगेश कंबु तसेच समस्त रहाटाड कोळीवाडा ग्रामस्थ, महिला व मुंबई मंडळ, शेकडोंच्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्ह्यातील दोन लाख मतदार जोडले गेले 'आधार'शी..!

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

मतदार यादी अपडेट व अचूक असावी, याकरिता भारत निवडणूक आयोगाने मतदार यादी आधारकार्डशी जोडण्याचा उपक्रम हाती घेतला असून त्यानुसार दि.१ ऑगस्ट २०२२ पासून मतदारयादी आधारकार्डशी जोडण्याचा कार्यक्रम सुरू झाला आहे. या महिनाभरात जिल्ह्यातील १ लाख ९३ हजार ३०४ मतदार आधारशी जोडण्यात आले आहेत.

त्यानुसार १८८ पनवेल- २४ हजार १०६, १८९ कर्जत- २३ हजार ७७४, १९० उरण- ३९ हजार ९३५, १९१ पेण- १६ हजार ९३८, १९२ अलिबाग- ६ हजार ४६५, १९३ श्रीवर्धन- ४७ हजार ४७७, १९४ महाड- ३४ हजार ६०९ अशा एकूण १ लाख ९३ हजार ३०४ मतदारांनी आज रोजीपर्यंत आपले मतदार ओळखपत्र आधारकार्डसोबत लिंक केले आहे.

जिल्ह्यातील एकूण मतदारांची संख्या २२ लाख ७० हजार ७६८ इतकी आहे. निवडणूक आयोग व जिल्हा प्रशासन जास्तीत जास्त मतदार ओळखपत्र आधार लिंक करण्यावर भर देत असून यासाठी जिल्ह्यात जागोजागी स्टॉल लावण्यात आले आहेत. यासोबतच काही विशेष शिबिरेसुद्धा आयोजित करण्यात येत असून यामध्ये आधार नोंदणीसाठी मतदारांकडून अर्ज क्रमांक ६ ब भरून घेतले जात आहेत.

तरी जिल्ह्यातील सर्व मतदारांनी जास्तीत जास्त संख्येने आपले मतदार ओळखपत्र आधारकार्ड सोबत लिंक करावे, असे आव-ाहन जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर व उपजिल्हाधिकारी (निवडणूक) स्नेहा उबाळे यांनी केले आहे.

# ऐन गणेशोत्सवामध्ये पुणे महाड प्रवासासाठी एस.टी.गाडी बदलल्याने प्रवाशांना भुर्दंड

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

गणेशोत्सव काळात अनेक प्रवासी वाहतूक करणाऱ्या खासगी बस सेवेच्या मालक-चालकांनी अव्वाच्या सव्वा भाडे आकारणी करून प्रवाशांची लुट केल्याचे काही वृत्तवाहिन्यांकडून स्टींग ऑपरेशनद्वारे उघड झाले असताना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळानेदेखील गाडी बदलल्याचे कारण पुढे करून वाहकांमार्फत ऑनलाईन तिकिट काढलेल्या प्रवाशांसह सर्वच प्रवाशांकडून जादाचे भाडे वसूल केल्याची घटना चर्चेत आली आहे.

२ सप्टेंबर २०२२ रोजी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास स्वारगेट पुणे या स्थानकातून महाडकडे येण्यासाठी सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास स्वारगेट विन्हेरे अशी ऑर्डीनरी एक्सप्रेस प्रकारची बस सोडण्यात येणार असल्याने अनेकांनी पुणे येथून महाडकडे येण्यासाठी ऑनलाईन तिकिटाचे बुकींग करून पेमेंट केले. यावेळी अचानक सामान्य गाडीऐवजी निमआराम बस (एमएच ०६ एस ८९६३) या मार्गावर सोडून प्रवाशांना स्वारगेट तसेच पुणे शहराच्या अन्य भागातून गाडीमध्ये प्रवेश देत एस.टी. वाहकामार्फत महाडच्या प्रत्येक प्रवाशामागे ७५ रूपयांपर्यंत तिकिटदरातील फरकाची रक्कम वसूल करण्यात आली. यामुळे संतप्त प्रवाशांनी वाहकासोबत हुज्जत घातली.

काही गरीब प्रवाशांना त्यांचे नातेवाईक स्वारगेट स्थानकामध्ये सोडून माघारी पुणे शहरातील निवासस्थानी गेले असता वाहकाकडून तिकिटाच्या फरकाची रक्कम मागताना अरेरावीची भाषादेखील झाली. यावेळी काही प्रवाशांनी महाड एस.टी.आग-ाराशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता कोणत्याही प्रकारचे सौजन्य या प्रवाशांना दाखविण्यात आले नाही. ज्या ज्या ठिकाणी ऑनलाईन तिकिट बुकींग करून महाडपर्यंतच्या प्रवासासाठी प्रवासी गाडीमध्ये चढले. त्या सर्वच ठिकाणी वाहकाकडून तिकिटातील फरकाची रक्कम मागण्यात आल्याने वाहक आणि प्रव-ाशांमध्ये शाब्दीक वादावादी होत असल्याचे दिसून आले. प्रत्येकवेळी या फरकाच्या रक्कमेचे डिफरन्स तिकिट यावेळी वाहकाकडून प्रवाशांना देण्यात आले.

मजल दरमजल प्रवास करीत या गाडीने प्रवाशांना महाड एस.टी.आगारामध्ये आणल्यानंतर अनेकांनी महाड कंट्रोल केबिनमध्ये फरकाच्या रक्कमेच्या वसूलीबाबत तक्रार केली असता साध्या बसऐवजी निमआराम बसमधून प्रवास झाला ना, आता कशाला फरकाच्या रक्कमेबाबत बोलताय, असे समजविण्याचा प्रयत्न झाल्याने अनेक प्रवासी निरूत्तर होऊन आपआपल्या घरी परतले. मात्र, साध्या गाडी ऐवजी निमआराम बस सोडून साध्या गाडीच्या प्रवाशांना फरकाची रक्कम अदा करण्यास भाग पाडणाऱ्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वाहक आणि स्वारगेट तसेच महाड येथील वाहतूक नियंत्रकांना याबाबत जाब विचारून वरिष्ठांनी ऑनलाईन पेमेंट करणाऱ्या एस. टी. प्रवाशांकडून रोख रकमेस्वरूपात घेतलेली फरकाची रक्कम ऑनलाईन रिटर्न करण्याची आवश्यकता व्यक्त होत आहे.

# शिवसेना शिंदे गट भव्य रोजगार मेळावा घेणार : ॲड.राजीव साबळे

**दै.रायगड नगरी । माणगाव**

ॲड. विराज महामुणकर, युवासेना सहसचिव यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवार दिनांक ०३/०९/२०२२ रोजी युवासेना आढावा बैठक माणगांव येथे संपन्न झाली. महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग या खात्यामार्फत असणाऱ्या विविध योजनांचा लाभ द. रायगड जिल्ह्यातील तरुणांना नोकरी व व्यवसायात संधी उपलब्ध करून देण्यासाठी युवासेना प्राधान्याने कार्यरत राहणार आहे. लवकरच महाराष्ट्र शासनमार्फत शिवसेना-युवासेना शिंदे गट दक्षिण रायगड जिल्हा यांचे वतीने तरुणांसाठी 'भव्य रोजगार मेळावा' आयोजित करण्याचा निर्धार शिवसेना नेते ॲड.राजीव साबळे व्यक्त केला.

याप्रसंगी युवासेना द. रायगड जिल्हाप्रमुख विपुल उभारे, शिवसेना माणगांव तालुका प्रमुख ॲड.महेंद्र मानकर, उपनगरध्यक्ष सचिन बोंबले, नगरसेवक कपिल गायकवाड, नगर-सेवक दिनेश रातवडकर, शिवसेना माणगांव तालुका सरचिटणीस विरेश येरुणकर, शिवसेना शहरप्रमुख सुनील पवार, युवासेना तालुका सचिव जितेंद्र तेटगुरे, माणगांव शहर अधिकारी सिद्धेश पिंगळे, माणगांव उपशहर प्रमुख प्रसाद धारीया, माणगांव तालुका युवासेना समन्वयक श्रीराम कळंबे, विभाग प्रमुख योगेश बक्कम, महिला उपतालुकाप्रमुख सारिका जाधव, माणगांव शहर उपशहर अधिकारी शक्ती सोनार, फहद करबेलकर, स्वप्निल उभारे, माणगांव शहर शाखा प्रमुख, मिडिया अध्यक्ष माणगांव शहर, तसेच आर्यन साबळे, सागर मोरे, प्रशांत वाढवळ, विजय उभारे, सरियार खान, रुपेश पुजारी, आकाश पवार, राजेंद्र सुर्वे, गोविंद पाटिल, सुरज टेंबे, प्रशांत शेडगे, सुमित काळे, भाविन सुतार शिवसेना-युवासेना पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

# मुरूड गणपती आरास सजावट स्पर्धेत संतोष नाईक प्रथम

**दै.रायगड नगरी । मुरुड**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आणि सुनील तटकरे युवा प्रतिष्ठान आयोजित पर्यावरण पूरक गणपती आरास स्पर्धा २०२२ नुकतीच संपन्न झाली. गेल्या २ वर्षी कोरोनाच्या काळात गणेश उत्सव साध्या स्वरूपात साजरा केला होता. पण या वर्षी मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. यंदाच्या पर्यावरण पूरक गणपती आरास २०२२ मध्ये मुरुड कुंभारवाडा येथील श्री. संतोष नाईक आणि परिवार यांनी प्रथम क्रमांक पटकाविला आहे. तर गौरी सजावट स्पर्धेत निलांबरी हणमंते भंडारवाडा हीने प्रथम क्रमांक पटकाविला आहे.



परंपरा आपल्या सणाची... आपणच जपायची असे विषय असणारी ही सजावट सगळ्यांचे आकर्षण ठरली आहे. चैत्र महिन्यातील गुढीपाडवा ते फाल्गुन महिन्यातील होळी रंग पंचमी अश्या सगळ्या सणाचा देखावा यात दाखविला आहे. प्रत्येक सणाचे बारखावे यात टिपले आहेत.

गणपती आरास सजावट स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्रेरणा चौलकर, गणेश आळी यांनी तर तृतीय क्रमांक अभिजित ठाकूर, शेग वाडा यांनी पटकावला. उत्तेजनार्थ पूजा कोर्लेकर, विक्रांत पाटील यांना ट्रॉफी बक्षीस देण्यात आले. तसेच गौरी सजावट स्पर्धेत द्वितीय क्रमांक सुनिता बैकर तर तृतीय क्रमांक मानसी धागावकर यांनी पटकावला. उत्तेजनार्थ ओंकार पवार यांचा ट्रॉफी बक्षीस देवून गौरव करण्यात आला.

माजी पालकमंत्री व आमदार अदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेसचे मुरुड तालुका अध्यक्ष मंगेश दांडेकर, तालुका महिला अध्यक्ष ड. मृणाल खोत मुरुडशहर अध्यक्ष विजय भोय, तालुका चिटणीस विजय पैर, राकेश मसाल, ओम भोय, मनिष माळी, जगदिश आंबुकर श्रेयस सरपाटील, दिपक राजपुरकर,प्रमिला माळी यांनी परिश्रम घेतले. तसेच स्पर्धे चे परीक्षक म्हणून अभय पैर, ॲड. मृणाल खोत, प्रमिला माळी, जुईली गुंजाळ त्यांनी कामकाज पहिले.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## महाराष्ट्र शासन
### कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
### सार्वजनिक बांधकाम विभाग
### पनवेल (भिंगारी) ४१०२०६

Tel : 27452778 Mail : panvel.ee@mahapwd.gov.in Web site : http://www.mahapwd.gov.in

जा.क्र.सा.बां.वि.पनवेल/निविदा/ दिनांक :-

### ई-निविदा सुचना क्र.२९ सन २०२२-२३ (फेर निविदा क्र.१)
### (ऑफलाईन निविदा)
### सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेल

खालील कामाच्या बी-१ निविदा कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, पनवेल, दूरध्वनी क्रमांक : ०२२-२७४२७७८ हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून नोंदणीकृत (पंजीकृत) कंत्राटदारांकडून मागवित आहेत. कोऱ्या निविदा नमूदा कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, पनवेल यांच्या संकेत स्थळावर दि.०६/०९/२०२२ सकाळी १०.०० ते दि.१५/०९/२०२२ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत ऑनलाईन (www.mahapwd.gov.in) वर उपलब्ध आहे. कार्यकारी अभियंता हे ठेकेदाराने भरुन पाठविलेल्या सिलबंद निविदा ऑफलाईन पद्धतीने दि.१९/०९/२०२२ रोजी सकाळी १०.०० ते १८.०० वाजेपर्यंत स्वीकारतील आणि दि.२०/०९/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता शक्य झाल्यास उघडण्यात येतील.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत (रु.लक्ष) | इसारा रक्कम (रुपये) | नोंदणी वर्ग | ई-निविदा संचाची किंमत जीएसटी धरुन | काम पूर्ण करण्याचा कालावधी | कामाचे लेखाशिर्षक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मोठी जुई अंतर्गत रस्ता तयार करणे, ता.उरण, जि.रायगड | ०७.०८ | ८०००/- | वर्ग ७ व वरील | ६००/- | ६ महिने | ४५१५ आमदार निधी |
| २ | माजगाव येथे सभा मंडपाचे बांधकाम करणे, ता.खालापूर, जि.रायगड | ८.६१ | ९०००/- | वर्ग ८ व वरील | ६००/- | ६ महिने | 4515 (MP FUND) |
| ३ | चिरनेर येथील फुटपाथ रस्ता अ व बंद गटर यांचे बांधकाम करणे, ता.उरण, जि.रायगड | ३.५४ | ४०००/- | वर्ग ८ व वरील | ६००/- | ६ महिने | २२१६ |
| ४ | खोपोली येथील पोलीस निवासी स्थाने, तहसील निवास स्थाने, खोपोली व खालापूर, सा.बां.विभागातील निवास स्थाने, खालापूर येथील दिवाणी न्यायाधिश निवासस्थाने खालापूर, ता.खालापूर, जि.रायगड येथील किरकोळ दुरुस्ती करणे (ताडपत्री २०० GSM, नायलॉन दोरी, बांबू ५० मि.मी. (४.५ ते ६ मी) व कामगार) या बाबींचा पुरवठा करणे व बसविणे, ता.खालापूर, जि.रायगड | ५.७१ | ६०००/- | वर्ग ७ व वरील | ६००/- | ३ महिने | |
| ५ | खोपोली पोलीस स्टेशन चौक हॉस्पिटल, खालापूर येथील पोलीस आणि चौक येथील पोलीस चौकी, येथील किरकोळ दुरुस्ती करणे (ताडपत्री २०० GSM, नायलॉन दोरी, बांबू ५० मि.मी. (४.५ ते ६ मी) व कामगार) या बाबींचा पुरवठा करणे व बसविणे, ता.खालापूर, जि.रायगड | ८.३० | ९०००/- | वर्ग ७ व वरील | ६००/- | ३ महिने | २०५९ |
| ६ | खालापूर येथील तहसील कार्यालय, खालापूर येथील मुख्य न्यायालय इमारत, खालापूर येथील शासकीय विश्रामगृह, चौक, शासकीय गोदाम मुळगाव, ता.खालापूर, जि.रायड येथील किरकोळ दुरुस्ती करणे (ताडपत्री २०० GSM, नायलॉन दोरी, बांबू ५० मि.मी. (४.५ ते ६ मी) व कामगार) या बाबींचा पुरवठा करणे व बसविणे, ता.खालापूर, जि.रायगड | ८.७५ | ९०००/- | वर्ग ७ व वरील | ६००/- | ३ महिने | २०५९ |

ई-निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक ०६/०९/२०२२ ते दिनांक १५/०९/२०२२
ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) : दिनांक २०/०९/२०२२
निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग, पनवेल यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

टिप :-

१) सर्वपात्र/इच्छुक निविदाकारांनी निविदाकारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणाली http://mahatenders.gov.in

२) निविदाकारांनी नमूद केलेल्या संकेत स्थळावर ऑनलाईन देकार भरणे संदर्भात व DSC डिजिटल प्रमाणपत्र वितरित व Portal वर Enrollment करण्या संदर्भात काही शंका / अडचणी असल्यास त्यांनी खालील दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

Toll Free No.1800 3070 2232, E-Mail : eproc.maharashtra@gmail.com, cppp-support@nic.in

३) निविदाकारांनी निविदा संदर्भात सर्व दस्ताऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील. तसेच इसारा/बयाणा रक्कम, ई-निविदा संचाची किंमत याबाबतचे दस्ताऐवजाच्या मुळप्रती स्वतःच्या नावाची गोपनियता बाळगून ई-निविदा वेळापत्रकामध्ये नमूद केलेल्या दिनांक व वेळेपर्यंत नुसार करणे आवश्यक आहे. अन्यथा ई-निविदा प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही.

४) सादर केलेल्या निविदा कागदपत्राची प्रत स्वतंत्र पाकीटात दि.१५/०९/२०२२ रोजी किंवा त्यापूर्वी कार्यालयीन वेळेत सादर करावी.

५) शासन निर्णयानुसार निम्नत्तम निविदाकारांचा (L-१) कमी दराबाबतचा (Performance Security) चा DD/FDR/B.G. लिफाफा क्र.२ (Financial Bid) उघडल्याच्या दिनांकापासून ८ (आठ) दिवसांच्या आत या कार्यालयात सादर करण्यात यावा. सादर न केल्यास निम्नत्तम निविदाकाराची (L-१) इसारा रक्कम (EMD) शासन जमा करण्यात येईल व सदर निविदाकारास पूर्ण एक वर्षासाठी कोणत्याही निविदा प्रक्रियेस सहभागी होता येणार नाही तसेच अशा निविदा नव्याने मागविण्यात येतील.

६) इतर अटी व शर्ती ई-निविदा मध्ये पहावयास मिळतील.

७) सदर कामाची ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.

८) वरील कामाची ई-निविदा सुचना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.com या इंटरनेट वरील वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**सा.बां.विभाग, पनवेल**

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां.विभाग, पनवेल-४१०२०६**
E-Mail : panvel.ee@mahapwd.gov.in
**दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४५२७७८ फॅक्स ०२२-२७४६७४४०**
**ई-कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र.२९ (ई-निविदा) सन २०२२-२३ (फेर निविदा क्र.१)**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दूरध्वनी क्र.०२२-२७४५२७७८ फॅक्स ०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदारांकडून कामांकरिता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सुचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

टिप :- या निविदेमध्ये एकूण ०६ कामे समाविष्ट असून ऑनलाईन निविदा विक्री दि.०६/०९/२०२२ रोजी सकाळी १०.०० ते दिनांक १२/०९/२०२२ सायंकाळी १८.०० पर्यंत व ऑफलाईन बीडप्रिपरेशन दिनांक १२/०९/२०२२ रोजी संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

ई-निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/.....
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां.विभाग, पनवेल, जि.रायगड
दिनांक :-
क्र.जिमाका/राअ/जाहि/१०७/२०२२-२३

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**सा.बां.विभाग, पनवेल**